REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# ''मराठी नवकथेतील प्रयोगशीलतेचे स्वरूप''

डॉ. मीता दिनकरराव कांबळे
सहयोगी प्राध्यापक, भारतीय महाविद्यालय, अमरावती.

## प्रास्ताविक —




कथा ऐकणे व कथा सांगणे हा मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. अनेक लोकगीतांप्रमाणेच लोककथांतून मानवाच्या ह्या स्वभावाचे दर्शन घडते. त्यामुळेच कथा हा वाङमयप्रकार अत्यंत लोकप्रिय आहे. कथा , कहाण्या , व्रतकथा , आख्यान , दृष्टांतकथा असे तिचे विविधांगी रूप प्रकट होते. आधूनिक मराठी कथेचा जन्म सुमारे १८९० मध्ये ह.ना.आपटेंच्या 'स्फुट गोष्टी' पासून झाला . वि. सि. गुर्जर , कृ. के. गोखले , श्री . कृ. कोल्हटकर ही त्याकाळची प्रसिद्ध कथाकार होते . ह्या नंतरचा कालखंड दिवाकर कृष्ण व फडके — खांडेकर ह्या जोडींचा होता. फडक्यांनी कथेला सौंदर्यदृष्टी दिली तर खांडेकरांनी तिला जीवनाभिमुख बनवले . य. गो. जोशी व दत्त रघुनाथ कवठेकर ह्यांचेही या कालखंडातील योगदान उल्लेखनीय आहे.

१९२६ ते १९४० या कालखंडात तंत्रदृष्ट्या , विषयदृष्ट्या व प्रकारदृष्ट्या खूपच विविधता आली . रूपककथा , लघुतमकथा यांसारखे नवीन कथाप्रकार पुढे आले. प्रादेशिक, ग्रामीण व शहरी रूपांत कथा प्रकटु लागली. अनेक नियतकालिकांतून कथेचा संचार वाढू लागला. पण ह्या काळात तंत्राचे जास्त वर्चस्व वाढल्याने आशयापेक्षा अभिव्यक्तीलाच अधिक महत्त्व देण्यात येऊ लागले. यामुळे ह्या काळात बाह्य कारागिरी वाढली बाह्य सौंदर्य दिमाखात मिळवू लागले. पण अनुभुतींचा कसदारपणा गायब झाला. काही कथांतून जिवंतपणा व चैतन्याच्या खुणा जाणवल्या तरी एकूण कथा मात्र आवर्तनात सापडली होती. कृत्रिम व सांकेतिक बनू लागली. १९४३ — ४४ नंतर मात्र हे स्वरूप पालटले.

## नवकथेच्या प्रारंभकालाची लक्षणे —

जुन्या कथा चाकोरी सोडून नवे स्वरूप दाखवू लागल्या. जीवनाचे सूक्ष्म व अनुभुतीपुर्ण चित्रण विविध पातळ्यांवरून होऊ लागले. मानवी मनाच्या गाभ्याच्या अंतरंगाबद्दलचे कुतुहल जागे झाले . गो.के. भट , उमाकांत ठोमरे, शशीकांत पुनर्वसु . रा.भि. जोशी , प्रभाकर पाध्ये . ह्यांच्या कितीतरी कथांतून याची पूर्वचिन्हे दिसू लागली वामन चोरघडे व कुसुमावती देशपांडे ह्यांच्या उल्लेखनीय योगदानामुळे मराठी कथेने कात टाकली व तंत्रात अडकलेल्या कथेला मोकळे केले . काव्यात्मवृत्ती व चिंतनशीलतेचा सुंदर व मनोज्ञ संगम त्यांच्या कथांतून दिसयून येतो. अंतर्मुखता व मनोविश्लेषणाचे सामार्थ्य ह्यांच्या आधारे तंत्राची चौकट त्यांनी झुगारुन दिली. आजच्या नवकथांची बीजे आपणाला त्यांच्या कथांतून आढळतात.

## नवकथेचे स्वरूप —

१९४५ च्या सुमारास मराठी कथेचे स्वरूप पुर्णत: पालटले. सत्यकथा , अभिरूची , साहित्य ही नियतकालिके नवकथा व नवकविता आवर्जुन प्रकाशीत करू लागली . नवकथेचे हे बदलते स्वरूप

आशय व आविष्कार ह्या दोहोतील बदलाने सिद्ध झाले. वास्तवाचा थेट वेध कथांमधून येऊ लागला. दुसऱ्या महायुद्धाने संपूर्ण जगाची मानसिकता बदलुन गेली. संपूर्ण मानवी मूल्यांवर जबरदस्त आघात झाल्याने निर्माण झालेली विकलता व वैफल्य ह्याला साहित्यात शब्दरूपाने वाट मिळू लागली. बदलत्या समाजाच्या मनोवृत्तीचे सूक्ष्म चित्रण करणे कथेला गरजेचे वाटू लागले. यंत्रयुगीन संस्कृतीमुळे यांत्रिकीकरणाच्या आहारी गेलेला मानव विध्वसंक अस्त्रांच्या प्रयोगांमुळे निर्माण झालेली दहशत , क्रोर्य व भयाचे वातावरण व गोंधळून गेलेली मानवता हा मराठी कथेचा केंद्रबिंदू झाला. मनोविश्लेषणाच्या तंत्राच्या साह्याने नवकथा माणसाच्या अंतर्यामी दडलेल्या सुप्त , असुप्त विकार व भावनांची चित्रे रंगवू लागली . आशयाबरोबर अभिव्यक्तीतही नवे प्रयोग होऊ लागले. १९४५ सालानंतरच्या काळातील कथेत झालेला हा अंतर्बाह्य बदल मुख्यत: अरविंद गोखले , गंगाधर गाडगीळ , पु.भा. भावे, आणि व्यंकटेश माडगुळकर यांच्या कथांतून स्पष्टपणे जाणवू लागला.

### अरविंद गोखले –

व्यक्ती हे अरविंद गोखले ह्यांच्या कथेचे केंद्र आहे . त्यांची कथा व्यक्तिमत्त्वाचा कानोसा घेत अलगद त्यांच्या अंतरंगात शिरते व अंतर्मनातील सुप्त व्यथांना वाचारूप मिळते. त्यांच्या कथांतील व्यक्ती समाजाच्या विविध स्तरांतून आलेल्या आहेत. तरीही गोखलेंची लेखणी सामान्यांपेक्षा असामान्यांचे लेखन करण्यात रमते. त्यामुळे सामान्यापेक्षा वेगळी असलेल्यांची दु:खे त्यांच्या कथांत दिसून येतात . कथाशैलीही प्रभावी व आकर्षक आहे . उदा . मंजुळा , रिक्ता , नकार , जग , अधर्म इत्यादी दृ

### गंगाधर गाडगीळ –

नवकथाकार ही पदवी यथार्थतेने बहाल करावी इतके वेगवेगळे प्रयोग गाडगीळांच्या कथेने नवकथेच्या दालनात केलेले आहेत. अनुभव घेण्याची पद्धती व ते आविष्कृत करण्याच्या विविध तऱ्हा यामुळे त्यांची कथा विविधांगी झालेली आहे . व्यक्ती व प्रसंग त्यांच्या वरवरच्या चित्रणात न रमता त्यांच्या मुळापर्यंत जाऊन सखोल चित्रण करण्याच्या त्यांच्या कसबामुळे नवकथेमध्ये नवनव्या प्रयोगांचा बहुमान त्यांना प्राप्त होतो .

मध्यमवर्गीय समाजात सामाजिक परिस्थितीमुळे , व्यवस्थेमुळे , संस्कृतीमुळे , दारिद्रय व यांत्रिकतेच्या चाकोरीमुळे दडपल्यागेलेल्या , मुर्दाड होऊ पाहणाऱ्या दुबळ्या पण व्यथित मनांचे चित्रण गाडगीळांच्या कथांतून येते . ह्या व्यथित मनांच्या संवेदना , विसंगती , विकृती , जाणिवा – नेणिवा यांचे बहुरंगी बहुआयामी रेखाटन अतिशय परिणामकारकरित्या गाडगीळ करतात त्यांचा भर वर्णनापेक्षा सूचनांवर असतो . गाडगीळांचा शोध हा खऱ्याखुऱ्या माणसांचा शोध आहे .

गाडगिळांच्या निवेदनशैलीत अनेकार्थाची वलये निर्माण करणारे तपशील आहेत. आशय व अभिव्यक्ती यांचे एकसंधपण स्तिमीत करणारे आहे . किडलेली माणसे , सुखी माणसे , दुबळा वारा भरलेले शीड ह्या उल्लेखनीय कथा आहेत.

गाडगिळांच्या कथांचा महत्त्वाचा विशेष म्हणजे त्यांची प्रयोगशीलता . कथालेखनातले त्यांचे नव–नवे प्रयोग बेडरपणे वाचकांना चकित करीत असतात . कथानकाचा ठराविक आराखडा सांगाडा ठरवून झुगारून दिला. अनेकदा रुढार्थाने कथा म्हणता येईल की काय अशी शंका येण्याइतके 'गोष्टीं'चे जोखड त्यांनी दूर केले विशिष्ट भाववृत्ती संक्रांत करणे हेच त्यांच्या कथांचे प्रयोजन दिसते. त्यामुळेच कथेतील आवर्त दूर होऊन ती स्पदनशील व जिवंत झाली दृ

### पु. भा. भावे –

जुन्या व परंपरागत मूल्यांबद्दल आदर व नव्या सुधारणा व उदात्त भावनांची संवेदना हे पु. भा. भावे यांच्या कथांचे विशेष आहेत. त्यांच्या अनेक कथा विलक्षण भाषप्रभुत्व , उत्कट भावना चकित करणारे कल्पनाविलास ह्यामुळे फार प्रभावी वाटतात. एखाद्या मनोविकार किंवा मनोवस्था अत्यंत प्रभावीपणे चित्रीत करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे. त्यांच्या कथांत पार्श्वभूमी किंवा वातावरण निर्मिती कौशल्यही आढळते.

भाव्यांची लेखणी प्रसंगी जितकी कोमल बनते तितकीच तिखट व भेदक बनते. व्यक्तीमन व परिस्थिती ह्यांच्या पारस्पारिक क्रिया व प्रतिक्रियांची वर्णने बहारदार व कौशल्यपूर्ण आहेत. त्यांनी प्रणयभावनेच्या विविध छटा रंगविल्या आहेत. उदा. सतरावे वर्ष , पहिले पाप , संस्कार, सुगंध प्रतारणा मोह इ. कथा वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

### व्यंकटेश माडगुळकर —

माणदेशी माणसांची सृष्टी व्यंकटेश माडगुळकरांच्या कथांतून फुललेली आहे . ग्रामीण कथांचे सांकेतीक व कृत्रिम संकेत झुगारून अस्सल माणदेशी मातीचा सुगंध कथांतून टिपला. माणगंगेच्या परिसरातील लोकांचे दारिद्रय , भोळेपणा , अडाणीपणा , विकारवशता , कणखरवृत्ती , खेडवळ माणसाचे विचार — विकार या सर्वांचेच दर्शन त्यांच्या कथांतून घडते .अस्सल माणदेशी प्रदेश त्यांनी शब्दांतून व्यक्त केला ग्रामीण कथेला अद्‌भुताच्या व कल्पनारम्यतेच्या कोंडीतून सोडवून वास्तव ग्रामीण कथेचा आदर्श निर्माण केला.

हे चार कथाकार नवकथेचे बिनीचे मानकरी आहेत . नवकथेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे कथा रंजनवाद , रूपवाद , सौंदर्यवादातून बाहेर पडून अनुभवगर्भ बनली . जीवनाचा अनुभव शब्दबद्ध करण्याच्या आग्रहातून तथाकथीत घटनाप्रधान कथानकाचा साचेबद्ध आकृतीबंध कोसळून पडला. स्थिरवृत्तीप्रधान स्वभावचित्रण करणाऱ्या कथांवरही आघात झाला. नवकथा एकाबाजूने विलक्षण अंतर्मुख झाली आणि जीवनातील स्थिर विचारांचे , भावनांचे साचे तडातडा तुटूफुटू लागले . अनुभवाचे नुसते ग्रहण नव्हे तर अनुभवाचे चिंतन —मनन नवकथेने महत्त्वाचे मानले. प्रत्याक्षात दुय्यम दर्जाच्या कथाकारांनी नव्या —नव्या अनुभवांची क्षेत्रे शोधली . पण बिनीच्या कथाकारांनी त्या अनुभवाच्या मननशील रूपाला आकार दिला . जुन्या कथाकारांना घटनांनी युक्त अशा कथानकांचा आधार होता किंवा माणसाच्या स्थिरवृत्तीचे चित्रण होते. आता त्यांच्या स्थिर स्वभावापेक्षा त्याच्या चपल गतिशील मन:स्थितीचे प्रवाहीपण पकडण्याचा व ते स्थिर बनलेल्या भाषा प्रयोगांतून व शब्दांतून व्यक्त करण्याचा भाषिक संघर्ष होता . यातून भाषेचे संज्ञाप्रवाही प्रयोग आले . स्वप्नचित्रणाची शैली आली , फ्लॅशबॅक पद्धतीवर भर आली फॅटसींचे प्रयत्न आले . दृष्टांत वा रूपक कथेच्या ऐवजी प्रतीकात्मक कथारूपे आली . आत्माविष्कार महत्त्वाचा ठरला ही कथा थेट जीवनाचे प्रतिबिंब होती. कल्पनाशक्तीचे दालने खुली करून जीवानाच्या सर्वांगीण दर्शनामध्ये सामान्य — असामान्य , प्रकृती — विकृती, वैचित्र्य — विवक्षिप्तपणा , अपवाद ह्या सर्वांचा शोध आणि वेध घेण्याचा प्रयत्न केला .

अनुभवाच्या प्रामाणिकपणाला व उत्कटतेला महत्त्व प्राप्त झाले. व्यक्तीव्यक्तीतील संबंध , रूढी , परंपरावरील आघात आदर्शपूजनाची ढोंगी वृत्ती, स्त्रीपुरुषसंबंधातील प्रेम व कामभावना यांना वेगळेच परिमाण प्राप्त झाले.

नवकथेचे उद्‌ध्वस्त होणारे बाह्यजग रेखाटले माणसाच्या मनाचा अंधकारपूर्ण तळकोपरा धुंडाळला . परंतु जीवन विकृत व सडके आले . ह्याचा उपरोध व उपहास व्यक्त करून माणसाचे किडलेले मन उघड केले विशषत: गाडगीळांवर सिनिसिझमचा आरोप झाला तरी माणसांच्या मनाविषयी अमाप कुतुहल व जिव्हाळा दिसतो. सामाजिकतेची सच्ची जाणिव त्यांच्या सहज निरिक्षणातून व मनोवैज्ञानिक दृष्टिकोनातून आलेली आहे. त्यांच्या यशाचे मुख्य कारण म्हणजे कुठल्याही पूर्वग्रह वा ग्रहकलुषित दृष्टिकोनाने माणसाकडे न बघता तटस्थ व निर्लेपपणाने माणसाचे चित्रण केले .

नव्या जगातील माणसांचे खिळखिळे झालेले संबंध , पराजितपणा , एकटेपणाची व्यथा हे नवकथेत फार मोठी जागा व्यापतात . माणासाचे मुड्स , संज्ञाप्रवाही शैली , स्वप्नप्रणाली , फॅटसीं असे अनेक अत्याधुनिक प्रयोग नवकथेने लिलया हाताळले आहेत .

नवकथेमध्ये आपल्या भावविश्वाशी प्रामाणिक राहून लेखन करणाऱ्यामध्ये शांताराम व दि. बा. मोकाशी यांची कथा लक्षणीय आहे . शांतारामांची कथा कौटुंबिक जीवनाची पाळेमुळे शोधत खोलवर जाते . माणसातल्या निसरड्या , चकवा देणाऱ्या पण हरघडी अनुभवाला येणाऱ्या जीवनानुभवांना पकडण्याचे त्यांचे सामर्थ्य महत्त्वाचे आहे. दि.बा. मोकाशी संयत , संथपणाने घटना व माणसे यांचे अलिप्तपणे वर्णन मांडतात .

### सदानंद रेगे —

रेगे सामान्य मानवी मनोधर्मापेक्षा निसरड्यामनाचा वेध तेवढ्याच तिरकसपणाने घेतात . रेंग्यांनी विधि प्रयोगधर्मी कथा लिहिली . रहस्यमय , भावप्रधान , मनोविश्लेषण प्रधान , तरल मनोवृत्तीने भारलेली , स्वप्न व फॅटसींच्या अद्‌भुतात संचार करणारी , काव्यात्म व कल्पनाचमत्कृतीने तळपणारी कथा लिहिली . मुंबईच्या कारकुनी — यांत्रिक जीवनाची चित्रणे येणारी त्यांची कथा एक प्रभाव निर्माण करते .

पु. शी .रेग्यांनी 'रूपकथ्थक' नावाने कथा लिहीली . मोजक्या शब्दांमध्ये स्त्रीविषयक तरल काव्यात्म विश्व त्यांच्या कथांमध्ये प्रकटले आहे.

ह्यांशिवाय अ.शं . अग्निहोत्री , शशिकांत पुनर्वसु , वसुंधरा पटवर्धन , कमला फडके , शांता शेळके , मंगेश व सरिता पदकी , शिरिष पै , शं. ना . नवरे , व. पु. काळे , विद्याधर पुंडलीक , जयवंत दळवी , पारगांवकर , शंकर खरात , सरोजीनी बाबर , हमीद दलवाई , मधुमंगेश कर्णिक ही नावे नवकथालेखकांमध्ये आघाडीवर आहे व प्रयोगशीलतेंची वेगवेगळी परिमाणे धुंडाळत आहेत.

द. मा. मिरासदार , शंकर पाटील , आनंद यादव , रा . रं . बोराडे , सखा कलाल , चारूता सागर , महादेव मोरे , राजन गवस यांनी ग्रामीण जीवनाचे आंतरिक स्पदंन टिपले . ग्रामीण जीवनातल्या ढासळत्या जीवनमूल्यांचा वाढत्या संघर्षाचा , व्यवहार — व्यापाराचा अनुभव सुक्ष्मपणे चित्रीत केला आहे . विशेषत: शंकर पाटील यांनी गाव गावातील माणसांच्या वृत्ती प्रवृत्ती व नाते संबंध हूबेहूब टिपले आहे . वामन होवाळ , शंकर खरातांची दलित विश्वाच्या अंगाने येणारी कथाही प्रभावी आहे . अण्णाभाऊसाठेंचे नावही महत्त्वाचे आहे .

### जी. ए. ची कथासृष्टी —

जी. ए. कुळकर्णींच्या लेखणीतून समर्थ कथा व्यक्त झाली आहे. प्रतीकात्मक व प्रतिमाप्रचुर निवेदनाने त्यांची कथा विलक्षण प्रवाही व ताकदवान बनते .'स्वामी , ऑफिस , यात्रिक , कवडे , रात्र झाली मोकळी , तुती , कैरी या कथा जीवनस्पंदनाने चैतन्यमय झालेल्या आहेत. जी.ए.नी कथा विश्वातून जीवनविषयक अमूर्त चिंतन व साहित्य याचा मेळ घातला. कथेच्या रूपाविषयी सर्व प्रकारचे आधुनिक प्रयोग व परंपरागत कथाशिल्पांचे रूपबंध यांचा वापर जि.ए. इतक्या सामर्थ्याने कोणीही केलेला नाही. जीवनातील काव्यात्मकता व तरलता टिपणारे जि.ए. भयानक हिंस्त्रपणाचे व क्रौर्याचेही तेवढेच ताकदीने चित्रण करू शकतात . मराठी नवकथेत जे स्थान गंगाधर गाडगींळाचे आहे तेच साठनंतर जि.ए.चे आहे.

### कमल देसाई —

स्त्री जाणिवांतून निर्माण होणाऱ्या कथा लिहितात . स्वप्ने (दु:स्वप्ने) फॅटसीं , अर्थगहन ,प्रतिभांची गुंतावळ , आंतरिक ताणाचा प्रचंड वाव , वर्तनातील चमत्कारिकपणा , स्वच्छंद कल्पनेचा प्रवाह ही त्यांच्या कथांची वैशिष्ट्ये आहेत.

### चि. त्र. खानोलकर —

सनई , राणूची गोष्ट , युद्ध , घनदाट , हडकुळा आणि गलेलठ्ठ , एक फाटका माणूस , पंढरी इत्यादी कथांतून मनाच्या वृत्ती —प्रवृतींचा जीवंत व विलक्षण प्रभावी पट चितारतात . अंत:प्रेरणेतून निर्माण झालेल्या जीवनजाणिवा व नियतीचे चित्रण करताना मृत्यूच्या छायेतला रसरसता कोंब म्हणजे त्यांची कथा होय .

अनिल डांगे , विलास सारंग , दिलीप चित्रे , विद्याधर पुंडलीक , श्री . दा . पानवलकर , आनंद जातेगावकर , ह.मो.मराठे , विजया राजाध्यक्ष , गौरी देशपांडे , बाळकृष्ण प्रभुदेसाई , श्रीनिवास कुळकर्णी यांची कथा विविध प्रयोगांना लिलया हाताळते . विशेषत: महानगरीय जंजाळामध्ये करपून जाणाऱ्या संवेदनांचे , यांत्रिक झालेल्या स्त्रीपुरुषसंबधांचे वर्णन करून आधुनिक युगामध्ये आत्मशोध घेण्यास प्रवृत्त करते , प्रसंगी स्वप्ने , दिवास्वप्ने , स्वगते यांची भाषा हाताळते दृ

## निष्कर्ष —

अशारितीने नवकथेने अतिशय दर्जेदार व समृद्ध प्रयोगशील स्वरूप प्रकट केले आहे. ती अतिशय तरल व तेवढीच परखड व कणखर आहे. मानवी मनाचे व्यमिश्रत्व टिपून जीवनविषयक मूलभूत प्रश्नांचे भान ती दर्शवते व वास्तवता प्रतिबिंबित करते हे सर्वात महत्त्वाचे आहे .

## संदर्भसूची —

१) मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप — संपा. गो.म. पवार ,म.द. हातगणंगलेकर,
२) समकालीन साहित्य प्रवृत्ती आणि प्रवाह — संपा. मृणालिनी पाटील ,ज्याती लांजेवार , मदन धनकर .